INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

# भारतीय समाज सुधारकांची भूमिका आणि त्यांचे कार्य

## (The Role and Work of Indian Social Reformers)

**प्रा. डॉ. भास्कर गायकवाड**
समाजशास्त्र विभाग,
ज्ञानोपासक महाविद्यालय,
परभणी (महाराष्ट्र, भारत)
E-mail ggaikwadbhaskar@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/06.2026-56744516/IRJHIS2606026**

**प्रस्तावना :**

सर्वसामान्यपणे "समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय" अशी व्याख्या समाज शास्त्रज्ञ मॅक आयव्हरआणि पेज यांनी केली आहे. ती सर्व मान्य देखील आहे सामाजिक जीवन जगताना समाजात दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्ती ह्या एकमेकांशी सामाजिक संबंधांनी बांधलेल्या असतात व समाजातील मूल्य व्यवस्थेला अनुसरून त्या क्रिया व आंतरक्रिया पार पाडत असतात. भारतीय समाज व्यवस्थेतही अनेक व्यक्ती एक दुसऱ्याशी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक बाबतीत एकमेकांशी समाज स्वीकृत मूल्यांप्रमाणे जीवन जगत असतात परंतु कालोघात ही मूल्य जर मानवाच्या सामाजिक हितात अडसर ठरत असतील तर अशावेळी समाज सुधारक आपल्या विचार कार्याच्या माध्यमातून समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

इसवी सन पूर्व सहाव्या शतकापासूनच भारतीय समाजात सामाजिक सुधारणा चळवळ सुरू झाली[1], त्यातून भारतीय समाज व्यवस्थेत परिवर्तन घडून येऊ लागले भारतीय समाज व्यवस्थेतील हिंदू धर्मातील कर्मकांडांचा अतिरेक आणि ब्राह्मणांना धर्मसत्तेमुळे समाजात प्राप्त झालेले निरंकुश स्थान धर्माच्या नावाखाली पशु बळीच्या प्रथेमुळे माजलेले हिंसाचाराचे प्रस्त अशा नीतिमत्ता आणि सदाचार यांचा होत असलेला लोपअशा दोषांनी कळस गाठला होता. अशावेळी या दोषांचे निराकरण व्हावे म्हणून आणि समाजात सामाजिक समता आणायची म्हणून महावीर आणि गौतम बुद्ध यांनी लोकांच्या समोर आपल्या शिकवणीतून समाजात नीतिमत्तेचा आधार निर्माण करून आचार विचाराचा एक आदर्श घालून देऊन सत्य, अहिंसा, क्षमा, शांती, प्रज्ञा, शील, करुणा, आणि मैत्री या मूल्यांचे महत्त्व लोकांसमोर प्रतिपादित केले आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले व यातूनच जैन धर्म आणि बौद्ध धर्माची स्थापना झाली व हे सारे तत्त्वज्ञान लोकभाषेत मांडल्याने धार्मिक शिकवणी बरोबर अन्य

शिक्षणाची ही केंद्रे विकसित झाली उदाहरणार्थ बौद्ध विहार, जैन विहार, तक्षशिला, नालंदा, बनारस, पाटलीपुत्र, अवंती, उज्जैन, वगैरे या धार्मिक सुधारणा चळवळीने खुद्द हिंदू धर्मात सुधारणा घडत आल्या एवढेच नव्हे तर पुढे या धर्माचा हिंदू धर्मात मिलाफ झाल्याचे अनेक वेळा दिसून आले.[2]

धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीत इंग्रजी शिक्षणातून पाश्चात्य समाजाचे, त्याच्या प्रगतीचे, विकासाचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे दर्शन भारतीयांना झाले. भारतीय समाजातील अंधश्रद्धा, अमानुष चालीरीती दांभिक धर्माभिमान यांचे निराकरण व्हावे असे अनेक सुशिक्षितांना वाटू लागले मानवतावाद, उदारमतवाद यांचे आकर्षण वाढू लागले हिंदू धर्मातील स्पृश्य अस्पृश्यता, बहुदेवाद, कर्मकांड यांच्या विरोधात 19 व्या व 20 व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी चळवळ निर्माण केली जात राजाराम मोहन रॉय यांनी धर्म मार्तंडांचा विरोध सहन करून सतीबंदीचा कायदा संमत करून घेतला, त्याचबरोबर ईश्वरचंद विद्यासागर यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून विधवा पुनर्विवाह हा धर्मसंमत ठरवला, बाळशास्त्री जांभेकरांनी एकंदरीत भारतीय समाजाची प्रगती कशी साधता येईल हा विचार कृतीत आणला त्यासाठी वृत्तपत्र माध्यमांचा वापर केला त्याच बरोबर दुर्गाराम मंछराम मेहताजी, दादोजी पांडुरंग तर्खडकर इत्यादी बरोबर स्वामी दयानंद यांचा आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटी व महात्मा ज्योतिराव फुले यांचा सत्यशोधक समाज स्वामी रामकृष्ण परमहंस व त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंद केरळातील नारायण गुरु यांनी मूळ हिंदू धर्मातील वैश्विकता मानवतावाद, उदारमतवाद यांचा पुरस्कार करून जातीभेद, स्त्रियांना कनिष्ठ स्थान, कर्मकांडांचे स्तोम ,पुरोहित वर्गाची देव व भक्त यांच्या मधली मध्यस्थी, अस्पृश्यता, भोंदूगिरी, बहुदेववाद, मूर्ती पूजा व अनेक अंधश्रद्धा यावर हल्ले चढविले दलितोधार, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री शिक्षण, स्त्री दास्य विमोचन, ब्राह्मण-ब्राह्मनेतर चळवळ व ब्राह्मण वर्गास यशस्वी आव्हान यामुळे भारतीय समाज व्यवस्थेत सर्व जाती धर्माच्या स्त्री पुरुषांना व्यक्ती विकासाची दारे मुक्त झाली.[3]

**महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे योगदान :**

महाराष्ट्रातील समाज सुधारकांची जगन्नाथ शंकर शेठ यांच्यापासून ते वर्तमान स्थितीतील अण्णा हजारे यांच्यापर्यंत एक श्रृंखलाच असलेली दिसून येते. समाजाच्या विकासात हडसर ठरणाऱ्या सर्व समस्यांवर या समाज सुधारकांनी आपल्या विचार कार्याने भरीव असे रचनात्मक योगदान दिलेले दिसून येते.

भारतीय समाजाच्या सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना आपल्या गुरुस्थानी मानणारे आणि महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने प्रभावित झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान हे भारतीय समाज सुधारणेच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वपूर्ण आहे त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म हिंदू धर्मातील दलित समजल्या गेलेल्या अस्पृश्यमहार जातीत 14 एप्रिल 1891 ला झाला जन्माने अस्पृश्य असल्याने, हिंदू धर्मातील जाचक रूढी प्रथा परंपरा यांचा प्रत्यक्षपणे अतिशय अमानुष असा त्रास त्यांना बालवयापासूनच अनुभवयास मिळाला व यातूनच त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली याचा परिणाम

असा झाला की त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांनी म्हटल्याप्रमाणे सर्व अधोगतीचे कारण अविद्या आहे हे खऱ्या अर्थाने समजून घेतले व आपली ज्ञान लालसा वाढविली आणि उच्च शिक्षणातील अनेक पदव्या संपादित केल्या व यामुळेच त्यांना भारतीय संविधानाच्या निर्मितीत अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी करता आली व स्वातंत्र्योत्तर भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांना जगभर मान्यता मिळाली.

**दलितोद्धाराचे कार्य :**

भारतीय समाजात अस्पृश्य गणल्या गेलेल्या जातीत महाराष्ट्रातील महार, मांग, चांभार या जातीचा समावेश होतो. हजारो वर्षापासून या दलित समजल्या गेलेल्या जातीवर भारतीय समाजातील वरिष्ठ वर्गाकडून अन्याय अत्याचार अतिशय जुलमी पद्धतीने होत आल्याने या वर्गाची प्रतिकार क्षमताच मरून गेली होती.[4]

अशा परिस्थितीत या दलित वर्गात स्वाभिमान निर्माण करणे त्यांचा आत्मविश्वास जागृत करून त्यांच्यावर होणाऱ्या जोर जबरदस्तीच्या विरोधात संघटितपणे न्यायासाठी संघर्ष करण्यास तयार करणे महत्त्वाचे होते. या दृष्टीने अत्यंत सुत्रबद्धपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दलित वर्गाच्या उद्धाराचे कार्य केलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील प्रमाणे गरज भासेल त्या पद्धतीची अतिशय टप्प्याटप्प्यांनी चळवळ निर्माण करून समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**माणगावची परिषद 1920 :**

कोल्हापूरच्या कागल संस्थान मधील माणगाव येथे वीस 20 मार्च 1920 रोजी अस्पृश्यांची एक परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून राजर्षी शाहू महाराज उपस्थित होते या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी राजकीय सामर्थ्य संपादन करण्यावर भर दिला याच परिषदेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलितांचे पुढारी म्हणून नेतृत्व उदयास आले.[5]

**बहिष्कृत हितकारणी सभा 1924 :**

बहिष्कृत हितकारणी सभेचे अध्यक्ष चिमणलाल सेटलवाड, उपाध्यक्ष जी. के. नरिमन, र. पु. परांजपे, बाळ गंगाधर खरे, सभेचे कार्याध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर सेक्रेटरी श्री सिताराम शिवथरकर हे होते या संस्थेचे उद्दिष्ट पुढील प्रमाणे होते.

बहिष्कृत हितकारणी सभेचे उद्दिष्ट बहिष्कृत वर्गाची स्थिती जनतेच्या नजरेस आणून देणे, जागृतीसाठी प्रचारक नेमणे, शिक्षणाच्या प्रसारासाठी शाळा वाचनालय वस्तीग्रह स्थापन करणे, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक व शेतकी शाळा चालविणे, दलितांच्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारी ही भारतातील पहिली संघटना होय, महाडचा सत्याग्रह देखील याच सभेमार्फत घडवून आणला गेला होता.

**महाडचा सत्याग्रह :**

सरकारने 4 ऑगस्ट 1926 रोजी कायदा करून सार्वजनिक पानवट्याच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या या कायद्यान्वये अस्पृश्यांना पानवट्यावर जाण्याचा मार्ग खुल्ला झाला होता परंतु त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नव्हती डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी 19 - 20 मार्च 1927 रोजी महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद आयोजित केली व 20 मार्च 1927 रोजी हजारो अनुयायांसह त्यांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.[6] अन्यायी समाज व्यवस्थेविरुद्ध केलेले हे बंड होते. तसेच अस्पृश्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारी ही प्रेरणा होती परंतु सनातनी मंडळींनी सत्याग्रहींना लाठ्या-काठ्यांनी मारले व गोमूत्र शिंपडून त्यांनी तळ्याचे शुद्धीकरण केले असे असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेतील अमानवी व अवैज्ञानिक अशा हिंदू धर्मातील जुलमी परंपरांना कायद्याच्या चौकटीतच विरोध केला. त्याचा परिणाम मानवी समाजाच्या विवेकाला जागृत करण्याच्या प्रक्रियेसाठी झाला त्याचबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी 26 डिसेंबर 1927 रोजी शूद्र जातींचा उपमर्द करणारी व त्यांचा समाजात अनादर वाढवणारी वचने ओतप्रोत भरलेली असल्याने व माणसा माणसा मध्ये भेद भाव निर्माण करणारी नीती असलेली "मनुस्मृति" गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे या ब्राह्मण कार्यकर्त्याच्या हस्ते महाड येथे सर्वांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तिचे दहन केले.[7] या मनुस्मृतीला धर्मग्रंथ म्हणून समाजात मान्यता असल्याने लोक योग्य अयोग्यतेचा विचार न करता या मनुस्मृतीतील चुकीच्या आणि अनिष्ट रूढी प्रथा परंपरांचे पालन करून समाजात समाज विघातक कृत्य करत होते ज्याचा निषेध म्हणून मनुस्मृतीचे दहन केले गेले. त्याचबरोबर समाजातल्या अनिष्ट परंपरेला सुद्धा हिंदू धर्मातील विषमता दृष्टीत तत्वेच कारणीभूत असल्याने त्यांनी 13 ऑक्टोबर 1935 ला येवला या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली.

**बौद्ध धर्माचा स्वीकार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीने सामाजिक जीवन जगण्यासाठी धम्माची नितांत आवश्यकता आहे कारण धर्म ही व्यक्तिगत बाब असून धम्म ही सामाजिक नीती आहे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी कसे वागावे याचे मूल्यात्मक तत्त्वज्ञान आहे. जे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वावर आधारलेले आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "बौद्ध तत्त्वज्ञान हा एक जीवन मार्ग आहे" म्हणून बौद्ध धम्माची समाजाला अत्यंत उपयुक्तता आहे यात वैज्ञानिकता असल्याने व कोणताही भेदभाव नसल्याने यात मानवी सुखासाठी आवश्यक असणारी प्रज्ञा- शील- करुणा मुदिता आणि मैत्री या मूल्यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे.[8] म्हणून ह्या विचारांच्या अंगीकाराने प्रत्येकाला सुख लाभ होऊ शकते आणि त्याला स्वतःच्या सुप्त गुणांचा विकास करता येतो म्हणून बुद्धतत्त्वज्ञान समग्र मनुष्यमात्राच्या कल्याणाचे तत्त्वज्ञान आहे. यासाठीच त्यांनी 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला व अस्पृश्य आणि कनिष्ठ समजल्या गेलेल्या समाजाला एक नवा सांस्कृतिक विचार दिला.

सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्याचा मागवा घेतल्यास आपणास असे लक्षात येते की भारतीय समाज सुधारकांच्या यादीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धर्म स्वीकाराच्या कार्यामुळे आज अस्पृश्य आणि समाजात हीन दिन समजल्या गेलेल्या लाखो लोकांची अतिशय झपाट्याने सर्वांगीण प्रगती होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**संदर्भ :**

1. ए. वाय. कोंडेकर, एस. एल. मोहिते-भारतीय समाज संरचना व परिवर्तन, खडके प्रकाशन कोल्हापूर, पहिली आवृत्ती 2011. पेज 17

2. कित्ता पेज 18
3. कित्ता पेज 26
4. डॉ. गव्हाणे किशोर व डॉ. शिंदे एस.पी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, युज्युकेशन पब्लिशर्स अँड डीस्ट्रीब्युटर्स औरंगाबाद, आवृत्ती 2014 पेज 253
5. किता पेज 253
6. कित्ता पेज 254
7. कित्ता पेज 255
8. डॉ. नरेंद्र जाधव- बोल महामानवाचे, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा, मुंबई. आवृत्ती 2012 पेज 484.